महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५५५७९७५
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

---

जा.क्र.तंशिविकापु/विवि-३/प्रवेश प्राधान्य/२०२१/ 600
दिनांक : 04 FEB 2021

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या
सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी
खाजगी विनाअनुदानित संस्था
(पुणे विभाग पुणे)

**विषय :- दहशतवादी हल्ल्यात वीर मरण आलेल्या पोलिस/लष्करी दल/निमलष्करी दलातील जवानांच्या पाल्यांना तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये संस्थास्तरावर भरण्यात येणा-या जागांवर प्राधान्य देण्याबाबत...**

संदर्भ :- १) तंत्र शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक : २अ/एडीएम/२०२१/४६,, दि.०२.०२.२०२१
२) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२६/तांशि-४, दि. ०१.०२.२०२१.

उपरोक्त विषयाचे संदर्भ क्र. १ चे पत्र व त्यासोबत जोडलेला संदर्भ क्र. २ चा शासन निर्णय या कार्यालयास प्राप्त झाला असून, सुलभ संदर्भासाठी व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी त्यांच्या छायांकित प्रती सोबत जोडल्या आहेत. प्राप्त झालेले संदर्भिय पत्र व शासन निर्णयाच्या अनुषंगाने या विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व खाजगी विनाअनुदानित संस्थांच्या प्रमुखांना कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी खाजगी विनाअनुदानित संस्थांमध्ये संस्थास्तरीय कोटयातील व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या रिक्त राहिलेल्या जागांवरील संस्थास्तरावर होणा-या प्रवेशामध्ये दहशतवादी हल्ल्यात वीर मरण आलेल्या (शहिद झालेल्या) पोलिसांच्या पाल्यांना तसेच राज्याचा रहिवाशी असलेल्या सीमेवर कार्यरत असतांना दहशतवादी हल्ल्यात वीर मरण आलेल्या (शहिद झालेल्या) लष्करी जवान/निमलष्करी दलातील जवानांच्या पाल्यांना प्रति अभ्यासक्रम जास्तीत जास्त एका जागेवर प्राधान्याने प्रवेश देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे असे या पत्राव्दारे आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

(डॉ.द.व्यं.जाधव)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

सोबत : संदर्भिय पत्र व शासन निर्णयाची छायांकित प्रत.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in , संकेतस्थळ: http://www.dtemaharashtra.gov.in

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे. 03 FEB 2021 क्र. 9049

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२१/ ४६ दिनांक : 2 FEB 2021

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर,

विषय :- दहशतवादी हल्ल्यात वीर मरण आलेल्या पोलिस/लष्करी दल/ निमलष्करी दलातील जवानांच्या पाल्यांना तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये संस्थास्तरावर भरण्यात येणा-या जागांवर प्राधान्य देण्याबाबत...

संदर्भ : शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०२१/ प्र.क्र.२६/तांशि-४, दिनांक १.२.२०२१

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी खाजगी विनाअनुदानीत संस्थांमध्ये संस्थास्तरीय कोटयातील व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या रिक्त राहिलेल्या जागांवरील संस्थास्तरावर होणा-या प्रवेशामध्ये दहशतवादी हल्ल्यात वीर मरण आलेल्या (शहिद झालेल्या) पोलिसांच्या पाल्यांना तसेच राज्याचा रहिवाशी असलेल्या सीमेवर कार्यरत असताना दहशतवादी हल्लयात वीर मरण आलेल्या (शहिद झालेल्या) लष्करी जवान/ निमलष्करी दलातील जवानांच्या पाल्यांना प्रति अभ्यासक्रम जास्तीत जास्त एक जागेवर प्राध्यान्याने प्रवेश देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. सोबत शासन निर्णय जोडण्यात आला आहे. सदर शासन निर्णय आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांच्या निदर्शनास आणण्यात यावा.

(प्रमोद नाईक )
सहसंचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत: माहितीस्तव अग्रेषित
१.मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण , महाराष्ट्र शासन, मंत्रालय,विस्तार भवन,मुंबई ३२
२.मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई ४०० ००१

दहशतवादी हल्ल्यात वीर मरण आलेल्या पोलिस/ लष्करी दल / निम लष्करी दलातील जवानांच्या पाल्यांना तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये संस्थास्तरावर भरण्यात येणाऱ्या जागांवर प्राधान्य देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२१/प्र.क्र.२६/तांशि-४
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ०१ फेब्रुवारी, २०२१.

वाचा :- १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.टीईएम-२००८/(५४२/०८)/तांशि-१, दिनांक २७ फेब्रुवारी,२००८
२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०२०-२१/३२, दिनांक २० जानेवारी,२०२१.

**प्रस्तावना :**

वर नमूद उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक २७ फेब्रुवारी, २००८ च्या शासन निर्णयान्वये मुंबई येथे आतंकवादी हल्ल्यात शहिद झालेल्या पोलिसांच्या व राज्य शासनाच्या इतर कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांना मोफत शिक्षणाची सुविधा प्रदान करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर आदेशाव्दारे पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काची तसेच इतर शुल्काची प्रतिपूर्ती शासनामार्फत करण्यात येते. देशरक्षणासाठी शहीद झालेल्या शूर व्यक्तींच्या कुटूंबाविषयी सहानुभूती व्यक्त करताना त्यांच्या कुटूंबियांना आर्थिक आधार तसेच योग्य दर्जाचे शिक्षण देण्याची सुविधा उपलब्ध करणे आवश्यक असल्यामुळे अशा शहिदांच्या पाल्यांना तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी खाजगी विनाअनुदानीत संस्थांमध्ये संस्थास्तरावरील जागांमध्ये प्राधान्य देण्याची तरतूद करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असलेल्या सीमेवर कार्यरत असताना दहशतवादी हल्ल्यात शहिद झालेल्या लष्करी अथवा निम लष्करी जवानांच्या पाल्यांना देखील अशाच स्वरुपाची सुविधा देण्याची बाब देखील शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी खाजगी विनाअनुदानित संस्थांमध्ये संस्था स्तरीय कोटयातील व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या रिक्त राहिलेल्या जागांवरील संस्था स्तरावर होणाऱ्या प्रवेशामध्ये दहशतवादी हल्ल्यात वीर मरण आलेल्या (शहिद झालेल्या) पोलिसांच्या पाल्यांना तसेच राज्याचा रहिवाशी असलेल्या आणि

सीमेवर कार्यरत असताना दहशतवादी हल्ल्यात वीर मरण आलेल्या (शहिद झालेल्या) लष्करी जवान / निम लष्करी जवान यांच्या पाल्यांना प्रति अभ्यासक्रम जास्तीत जास्त एक जागेवर प्राधान्याने प्रवेश देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. यासाठी विद्यार्थ्यांने विहित मार्गाने संबंधित संस्थेकडे अर्ज करणे आवश्यक राहिल. तसेच या प्रवेशासाठी संबंधित विद्यार्थ्यांने तो दहशतवादी हल्ल्यात वीर मरण आलेल्या (शहिद झालेल्या) पोलिसांचा पाल्य असल्याचा अथवा राज्याचा रहिवाशी असलेल्या आणि दहशतवादी हल्ल्यात वीर मरण आलेल्या (शहिद झालेल्या) लष्करी जवान / निम लष्करी जवान यांचा पाल्य असल्याचा योग्य तो पुरावा सादर करणे बंधनकारक राहिल.

२. हे आदेश शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये व त्यानंतर होणाऱ्या प्रवेशाकरीता लागू राहतील. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संचालक, तंत्र शिक्षण यांनी या निर्णयाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी. या अनुषंगाने संबंधित प्रवेश नियमांमध्ये यथावकाश दुरुस्ती करण्यात येईल

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२१०२०११३३६२०२६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(संजय औ. धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
५. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
७. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
८. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
९. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१०. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई
११. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई
१२. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई